Vol 5 Issue 5 Nov 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


### Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.D Research Scholar Faculty of Education IASE, Osmania University , Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

**Golden Research Thoughts** Impact Factor : 3.4052(UIF)
ISSN 2231-5063 Volume - 5 | Issue - 5 | Nov - 2015

GRT

# संगीत सम्राट तानसेन रचित निवडक धृपद रचना - एक अनुशीलन

अर्चना माधव अंभोरे
सहयोगी प्राध्यापक , श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला .

**सारांश :**

काव्य आणि संगीताचा संबंध अनन्यसाधारण आहे. काव्याचा संबंध शब्द आणि अर्थाशी आहे तर संगीताचा स्वर आणि तालाशी आहे. संगीत सम्राट तानसेन वाग्येयकार आणि गायकच नव्हते तर उच्च कोटीचे कवी होते.

तानसेनांनी रचलेल्या धृपद रचनांमुळे धृपद शैलीच्या प्रचार प्रसाराचा कीर्तीसुगंध केवळ ग्वाल्हेरपर्यंतच मर्यादित न रहाता संपूर्ण देशभरात फैलला.

प्रस्तुत शोधनिबंधात तानसेनाव्दारे रचित धृपदांची अव्दितीयता, मौलिकता तसेच महत्त्व इ.चा शोध घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**बीज शब्द (Keywords ):** धृपद शैली, तानसेन, वाग्येयकार, कवित्व गुण इ.

**संशोधन प्रणाली :**

तानसेनांनी रचलेल्या निवडक धृपद रचनांचा अभ्यास करुन रचनांची अव्दितीयता, मौलिकता तपासून त्या रचनांचे सांगितिक आणि साहित्यिक दृष्ट्या मूल्यांकन करणे.




**संगीत सम्राट तानसेन रचित निवडक धृपद रचना - एक अनुशीलन**

सम्राट अकबर कालीन महान संगीत सम्राट तानसेन 'संगीत' शब्दाचा पर्यायी बनला आहे. खालील अवतरणांवरुन हे निश्चित होते.

१)'अकबर के नवरत्नोंमें स्थान पाने के उपरांत तानसेन का प्रतिभा सूर्य, तत्कालीन भारत की राजधानी दिल्ली के अवकाश में अपनी सहस्त्र-सहस्त्र किरणों व्दारा अपने प्रकाश से देश को आलोकित कर गौरवान्वित करने लगा'[१]

२)'तानसेन समकालिन माधव कृत' वीर भानूदय काव्यम् के अवलोकन से यह जानकारी मिलती है कि तानसेन राजा रामचंद्र के समसामायिक थे । ये बीस वर्ष की आयू तक संगीत विद्या में पारंगत हो चूके थे ।[२]

३)'अकबर नामा' नुसार[३] संवत १६१९ मध्ये संगीताच्या अलौकिक दीप्तीयुक्त हा हीरा अकबर दरबारात प्रविष्ट झालेला हीरा एव्हढा प्रवीण झज्ञला दरबारे - अकबरीच्या जगप्रसिध्द नवरत्नांमधील एक स्थान त्याने प्राप्त केले आणि सहस्त्रतेजाने संगीत जगताला त्याने प्रकाशमय केले.

४) 'तुजुक जहांगीरीत' तानसेनाचा संगीतज्ञासोबत कवि असल्याचा उल्लेख मिळतो.

*नाद उदधि के पार को केतिक करी उपाय ।*
*मंजन के भय सरस्वती तूबी उर गहि लाय ।*[४]

अमर गायक आणि धृपदाचे स्रष्टा रचनाकाराच्या रुपात सम्राट तानसेन हा अव्दितीय असल्याचे अनेक दाखले मिळतात.

शैलीची परिपक्वता आणि गाण्यातील सौंदर्यात प्रस्तुतीत एव्हढी प्रगती केली की अकबर बादशहाने त्यांना 'कण्ठभरण वाणी विलास' ही पदवी दिली.[५]

**पदांची भाषा :**

तानसेन रचित धृपदांची भाषा ब्रजभाषा दिसून येते. ब्रजभाषेच्या माधुर्य, सौंदर्यादि गुणांमुळे या भाषेत तानसेनानी धृपदे रचली असावीत.

उदाहरणादाखल धृपदाची रचना -

*१)हमरे लला के सुरंग खिलौना, खेलत कृष्ण कन्हैया ।*
*अगर - चंदन को पलनौ बन्यो है, हीरा लाल जवाहर जरैया ।*
*भंवरी - भंवरा, चट्टा-वट्टा, हंस - चकोर, अरु मोर - चिरैया*

*तानसेन प्रभु जसोमति झुलावै, दौऊ करं लेत बलैया ।*[६]

वरील पदाचे अवलोकन करता असे लक्षात येते की -

१)नादमधूर ब्रजभाषेचा वापर तानसेनांनी केला आहे.

२)तानसेनाची भाषा चित्रमय आहे. आपल्या डोळ्यासमोर हुबेहूब चित्र उभे राहते.

३)वरील पदांतून पाळण्याला लावलेल्या खेळण्यांशी बाल कृष्णाचे खेळत असण्याचे वर्णन दिसून येते.

४)ब्रजभाषे सोबतच तत्सम, तद्भव, विदेशी आणि ध्वन्यात्मक शब्दांचा प्रयोग ते कुशलतेने करतात.

*२) धौरी धूमर पीयरी - काजर कहि-कहि टेरै ।*
*मोर मुकूट सीस, स्त्रवन कुंडल, कटि में पीतांबर पहिरै ।।*

*ग्वाल बाल सब सखा संग के, लै आवत ब्रज ने रै ।*
*तानसेन प्रभु मुख रंज लपटानी, जसुमति निरखि मुख हैरे ।*[७]

वरील पदाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की -

१)वरील पद प्रसादिक गुणाने युक्त आहे.
२)टेरै - पहिरै, ने रै - हे रै अशा यमकाने नाद माधुर्यात अधिकच भर पडली आहे.
३)भाषेचे माधुर्य वरील पदावरुन स्पष्ट होते.
४)योग शब्द निवडीने, शब्दाचा चपरवल वापर केल्यामुळे सजीव चित्र डोळ्या समोर उभे रहाते.

रागमाला ग्रंथातील पुढील पद -

*सब गुण जामे युक्त है, उत्तम कवि है सोई ।*
*जाने धातु को मात्र नहिं, मध्यम कवि वै होई ।*
*मात्र करै जो सोधि कै अमिल धातु कह राषि ।*
*कहये है मत संगीत के अधम सो कवि एहि भावि ।*[८]

'कविचे' गुणासंबंधी वर्णन वरील पदातून दिसून येते.
आज उपलब्ध असलेल्या तानसेनांच्या पदांचे वर्गीकरण ७ भागात करता येईल.

१)देवी-देवतांची स्तुती - प्रशंसा
२)भक्तिपर काव्य रचना
३)राजा, आश्रयदात्यांचा उल्लेख असणारे पद
४)होळी, ईद, मदन महोत्सव, विजयादशमी, शकुन विचार, प्रथा-परंपरांचे, पर्वोत्सवाचे वर्णन करणारे पदे.
५)नायिका भेद, रुप सौंदर्यादि वर्णने असणारी पदे
६)मनास उपदेशक पदरचना
७)नीति पर  उल्लेख असणारी पदे
८)सांगीतिक विवेचन असणारी पदे .

*पद रचना - १*
*उठि प्रभात सुमरिये, जै श्री गनेस देवा ।*
*माता जाको पारवती, पिता महादेवा ।।*
*अंधे न को नेत्र देत, कुष्ठी को काया ।*
*बंध्या को पुत्र देत, निर्धन को माया ।।*

*एक दंत दयावंत, चार भुजा धारी ।*
*मस्तक सिंदूर सो है, मूसक असवारी ।।*
*फूल चढै, पान चढै, और चढै मेवा ।*
*मोदक को भोग लगे, सुफल तेरी सेवा ।।*
*रिध्दि देत, सिद्धि देत, बुद्धि देत भारी ।*
*तानसेन गजानंद सुमिरो नर नारी ।।*[९]

१)प्रथमेश, श्री गणेशाचे वर्णन असणारे पद आहे.
२)काव्य रचना सरळ, सुलभ असल्याने जन सामान्यांत देखील लोकप्रिय आहे.
३)प्रात:काळी गणेशाचे स्मरण करावे असे तानसेन येथे सांगताहेत.
४)नादमाधूर्यता हा काव्य विशेष वरील पदांत दिसून येतो.

*पद क्र. २*
*ज्ञानवंत को रस अगम बुद्धि दैनी तू,*
*सब ही अंगन मानी हंसवाहिनी गिरा महावाक - वानी ।*

*जो तो हि ध्यावें, मन इच्छा फल पावै,*
*साधत कंठ प्रानी, करत बखानी ।।*
*तो सी तु ही और नाही विद्यादानी,*
*जे साधै, आराधै, तिहू लोक जग जानी ।*
*'तानसेन' की दीजै, राग - रंग वर बानी,*
*जौ लो गंगा धरनि, ध्रुव पवन - पानी ।।*[१०]

१)देवी सरस्वती स्तवनपर काव्य रचना
२)तानसेन एक याचक बनून देवी शारदेस याचना करताहेत की जसे गंगा, धरती, ध्रुव, पवन, पाणी अटळ आहे तसेच राग आणि वाणी चे वरदान मागत आहेत.
३)अत्यंत सुलभ, सरळ रचना आहे.
४)सरस्वती मातेचा महिमा वर्णिलेला आहे.

*भक्तिपर काव्य रचना -*

परमेश्वराप्रती आसक्ति असणे म्हणजेच 'भक्ति' होय. तानसेनांच्या रचनांमध्ये, भक्तिभाव, तल्लीनता, सगुण, साकार ईश्वराची तसेच निर्गुण निराकाराच्या उपासना देखील त्यांच्या पदातुन दिसून येते. प्रभू श्रीरामांप्रति भक्तिच्या अत्युच्च भावनेने ओथंबलेल्या अनेक पदांपैकी पुढील रचना -

*अब मै राम - राम कहि टेरौ ।*
*मेरौ मन लागौ उनही सौ, सीतापति-पद हेरों ।*
*चरन सरोज श्रवन मन मेरौ, धुज अंकुस सुख केरौ ।*
*तानसेन प्रभु तुम हो नायक, इन तरवन पर फेरौ ।*[११]

*वरील पद -*
१)प्रभू श्रीरामांच्या प्रति भक्तिभावना दर्शविणारे पद आहे.
२)दास्यभाव असलेले हे पद अतिशय हृदयस्पर्शी आहे.
३)टेरौ- हेरौ, केरौ, फेरौ यांसारख्या शब्द योजनांमुळे पदांस अधिकच माधुर्य आले आहे.

*पुढील रचना पहा -*
*इतभानु, उत साह अकबर, दो दरस जो देखै*
*सोई होत पवित्र, मंद समीरन के बर पावै, आवै गुपत आनंद ।*
*वे तिमिर-हरन ये दुख - भंजन,*
*ताके सोहै करियत साह दुनी मकरंद ।*
*वो सहस किरन प्रकास कीन्हौ, ये बुधि श्रेष्ठ मयाधर जग बंद ।*
*'तानसेन' कहा लौ अस्तुति करै, काटन हार विकार दुख- व्दंद ।।*[१२]

*वरील पदांत -*
१)तानसेनांनी सम्राट अकबराच्या गुणग्राहकतेचे वर्णन केलेले आहे.
२)अकबराची तुलना सूर्याशी केलेली आहे.
३)अकबराची तुलना करतांना अनेक उपमानांचा वापर केला आहे.

*पुढील रचना -*
*इंदु से बदन, नैन खंजन से, कंठ कोकिल वचन सुहाई ।*
*नासा कीर, अधर विद्रमु, दाडिम दसन दमकाई ।*
*श्रीफल उरोज, ग्रीव कपोत, बेनि नागसी झुकी सुखदाई*
*कटि केहरि, कदलीस जंघ, पद सरोज, पद्मासी ।*
*'तानसेन' ऐसी पे बलि बलि जाई ।*[१३]

वरील पदांत -
१) नायिकेच्या रुप - सौंदर्याचे वर्णन आहे.
२) पारंपारिक उपमानांचा यात वापर केला गेला आहे.
३) प्रस्तुत पदांत नायिकेच्या अंग-प्रत्यंगाचे अत्यंत प्रभावशाली वर्णन तानसेनाने केलेले आहे.

४) काव्य आणि रुपसौंदर्याचा घनिष्ठ संबंध आहे. म्हणूनच कवि तानसेनाने आपल्या कवितेत रुपाची अभिव्यक्ति केलेली आहे.
५) वरील पदामुळे मानवी हृदय आनंद विभोर होते.

*नायिका भेद वर्णन :*

नायिका भेदावर आधारित अनेक काव्य रचना तानसेनाने केलेल्या आढळून येतात. उदाहरणादाखल -

***माई री, महा कठिनभई मिलि बिछुरे की पीर ।***
***घरी - घरी पल - छिन जुग से बीतन लागे,***
***नैनन भरि - भरि आवत नीर ।***
***जब से प्यारौ भयौ है न्यारौ, कलनां परति मेरी वीर ।***
***'तानसेन के प्रभू बेगि आवन की जै, जियरा धरत नाही धीर ।*** [१४]

सण, समारंभ, उदा. होळी, ईद, मदन महोत्सव, विजया दशमी, शकुन विचारादि वर्णन करणारी पदे आहेत.

संगीत सम्राट तानसेनाने संगीत शास्त्रादि संबंधीत व्याख्या, सप्तसूर तीन ग्राम, एकवीस मूर्च्छना, कूटताना इ. पारिभाषिक शब्दावली देखील आपल्या धृपदांच्या रचनात योजिलेली आहे.

उदा. ***ओंकार ब्रह्मा उच्चारयौ चारों आनन,***
***तार करन सप्त प्रमान ।***
***सप्त सुर तीन ग्राम इकईस मूर्छना***
***बाईस सुरति उनचास कूट तान ।।***
***आरोही अवरोही अस्थाई संचारी, अंश न्यास गृहजान***
***औडव षाडव सुर सम्पुरन, 'तानसेन' गुरुज्ञान उर आन*** [१५]

पुढील रचना पहा -
***द्वै प्रकार संगीत है, मारग देशी जान***
***शास्त्रा ब्रह्मादिक के, कहो देशी देशि समान ।।***
***गीतवाद्य अरु नृत्य के, रस स्वैस गुन सोय ।***
***तानसेन उपजत नहीं, सो संगीत न होय । १६***

तानसेन केवळ वाग्येयकार गायकच नव्हते, ते एक उच्च कोटिचे कवि होते हे सिद्ध होते. विभिन्न राग रागिणींत त्यांनी पदे रचलेले आहेत.

*तानसेनाचे कवित्व सिध्द करणाऱ्या रचना -*
***गोविंद गोपाल गरुडगामी, गोपिनाथ,***
***गोवर्धनधारी गोप- मनरंजन ।***
***बंसीधारी गिरीधारी कुंजबिहारी बहुरुपधारी,***
***कंसारी मुरारी गर्वप्रहारी दुष्ट-गंजन ।***
***मधुसूदन माधव मथुरापती मुक्तेश्वर,***
***मन भावन दुखन भंजन ।***
***वासुदेव विठ्ठल बनवारी, बद्रीनाथ,***
***बौध्द रुप विष्णु 'तानसेन' भक्तमनन मंजन ।।*** [१७]

*वरील पदांत -*
१)वरील पदात अनुप्रास अलंकार आहे.
२)केवळ विशेषणांचा वापर कवीने केलेला आहे.
३)विशेषणांचा वापर करुन कवि तानसेनाने श्रीकृष्णाचे वर्णन सार्थ केले आहे.
४)वरील पदांतून तानसेनाचे उच्चकोटीचे कवित्त्व दिसून येते.
५)तानसेनाच्या काव्य प्रतिभेचा परिचय वरील पदांतून होतो.

तानसेनाच्या दृष्टितून मात्र काव्याचे स्थान संगीताच्या तुलनेत गौण आहे. त्यांच्या स्वत:च्या रचनेतून स्पष्ट होते.

***नाद उदधि के पार की केतिक करी उपाय ।***
***मंजन के भय सरस्वती तूंबी उर गहिलाय ।*** [१८]

अशा प्रकारे त्यांचे संगीतज्ञाच्या रुपालाच प्राधान्य होते. कवि रुप गौण होते

पं. भातखंडे यांनी तानसेनाच्या संबंधी असे म्हटले आहे की,

'तानसेन एक उत्तम गायक थे और उनकी रचना शक्ति भी अद्‌भूत थी । उन्होंने अनेक चमत्कार पूर्ण धृपद बनाये । परंतू हमारे यहाँ स्वरलिपी न होने के कारण उनके गीतों का अधिकांश भाग नष्ट हो गया । किसी प्रकार उनके रचे हुए जो भी गीत आजकल प्राप्त हैं, उनमें स्वरो और शब्दोंका रुपान्तर हो गया है । [१९]

### *निष्कर्ष :*

कवि तानसेनाच्या निवडक रचनांचा अभ्यास केल्यावर निश्चित रुपात खालील निष्कर्षांप्रति आपण पोहोचतो.
१)तानसेन केवळ संगीततज्ञच नव्हते तर उच्चकोटिचे कवि देखील होते.
२)उत्तम काव्य प्रतिभा त्यांचे ठायी दिसून येते.
३)उत्तम प्रतीच्या धृप रचना करुन धृपद शैलीस प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली.
४)तानसेनांच्या काव्यग्रंथातील ऐतिहासिक, साहित्यीक, सांस्कृतिक आणि सांगीतिक तत्त्व महत्वपूर्ण आहेत.
५)तानसेनांच्या रचनांमधील धृपदे ब्रजभाषेत लिहिलेली आहेत. पं. भातखंडेनी स्वरलिपी बध्द केलेली तानसेनांची पदे आजही गायल्या जात आहेत.
६)देवी देवतांचे स्तुतीगान असणाऱ्या रचना, भक्ति भावना असणाऱ्या रचना, राजा - महाराजांची स्तुती रचना, सण समारंभाच्या पर्वावर असलेल्या रचना उदा. होळी, ईद, मदन महोत्सव, विजया दशमी, शकुन विचार इ. प्रथांचे वर्णन, नायकनायिका भेद किंवा रुप-सौंदर्याचे वर्णन, मन प्रबोधन, नीतिपर रचना वर्णन इ. विषय वस्तू तानसेनांच्या काव्यात आहे.
७)कवि तानसेनांच्या संगीत विषयक पदांत - संगीत शास्त्राच्या व्याख्या, अनेक राग, वाद्य आणि गायन शैली, त्यांच्या पूर्वीच्या संगीतशास्त्रींच्या ग्रंथांचे त्यांनी केलेले अध्ययन त्यांच्या रचनांतून सिध्द होते.
८)तानसेनाच्या काळी प्रचलित वाद्यांचे वर्णन देखील त्यांच्या काव्यात मिळते. उदा. पखावज, ढोलक, तंबोरा, बीन, रबाब, मरज, डफ, मुरली इ.

पद - ***श्री नंद को नंदन खेलै जी हो - हो हो रा ।***
***ग्वाल बाल सब संग सखालै, ब्रजकी वीथिन हिंडोरा ।***
***ताल-पखावज - आवज बाजत, ढोलक और तंबोरा ।***
***बीन -रबाब - मरज - ढफ - मुरली - मधुर मधुर ध्वनि थोरा ।***
***कुंकुम- केसर - चंदन - वंदन, अबीर-गुलाल भर झोरा ।***
***'तानसेन' प्रभु फाग रच्यौ है, खेलत किसोरी - किसौरा ।*** [२०]

### *उपसंहार :*

राजा मानसिंग व्दारा अविष्कृत धृपद शैलीस प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्याबरोबरच जन सामान्यांच्या आवडीनुरुप परिवर्तन करुन धृपद शैली प्रचार व प्रसारात तानसेनाचे योगदान अव्दितीय, मौलिक असे आहे.

संगीताचार्य, कविवर्य तानसेनाव्दारे रचित धृपदांचे ललित्य, महत्व अनन्य साधारण असे आहे.

### *तळटीपा :*

१)बांगरे, अरुण, ग्वालियर की संगीत परम्परा पृ. १२७
२)चतुर्वेदी, नर्मदेश्वर, कवि तानसेन और उनका काव्य, पृ. ११-१२
३)मालवीय श्रध्दा, भारतीय संगीतज्ञ एवं संगीत ग्रंथ, पृ. ९८
४)तत्रैव, पृ. ९८
५)बांगरे अरुण, ग्वालियरकी संगीत परंपरा पृ. १२८
६)मीत्तल प्रभूदयाल, संगीत सम्राट तानसेन पृ. १३२
७)तत्रैव, पृ. १३२
८)अग्रवाल, सरयू प्रसाद, अकबरी दरबार के हिंदी कवि, पृ. १९
९)मीत्तल प्रभूदयाल, संगीत सम्राट तानसेन पृ. ५५
१०)तत्रैव पृ. ५८
११)तत्रैव पृ. ५८
१२)तत्रैव पृ. ८८
१३)तत्रैव पृ. १०४
१४)तत्रैव पृ. १२८
१५)तत्रैव पृ. ९१

१६)मालवीय श्रध्दा, भारतीय संगीत एवं संगीत ग्रंथ, पृ. १०२
१७)मीत्तल प्रभुदयाल, संगीत सम्राट तानसेन, पृ. ७८
१८)मालवीय श्रध्दा, भारतीय संगीतज्ञ एवं संगीत ग्रंथ, पृ. ९९
१९)जोशी उमेश, भारतीय संगीत का इतिहास पृ. २४१
२०)बांगरे अरुण, ग्वालियर की संगीत परंपरा पृ. १४३

*संदर्भ ग्रंथ -*

१)बृहस्पति, आचार्य (१९८९), संगीत चिंतामणी, संगीत कार्यालय, हाथरस २०४१०१
२)बांगरे, अरुण (१९९३), ग्वालियर की संगीत परम्परा, यशोयश प्रकाशन, हुबळी (कर्नाटक)
३)मालवीय, श्रध्दा (२०१०), भारतीय संगीतज्ञ एवं संगीत ग्रंथ, कनिष्क पब्लिशर्स, डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली - ११०००२
४)देसाई चैतन्य (१९७४) संगीत विषयक संस्कृत ग्रंथ, म.वि.ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर
५)संगीत कलाविहार (मे २०१३), जीवनी विशेषांक, अ.भा. गांधर्व महाविद्यालय मंडळ प्रकाशन

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org